# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थांच्या गैरकारभाराबाबत

**(१) ४७६३ (२१-०८-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था (एससीईआरटी) या दोन्ही संस्थांकडून शासनाच्या निधीचा होत असलेला दुरुपयोग तसेच तेथील आर्थिक अनियमिततेची वित्त विभागामार्फत चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव, प्राथमिक शिक्षण परिषदेच्या (समग्र शिक्षा) राज्य प्रकल्प संचालक यांनी शिक्षण विभागाचे अपर सचिव तसेच मुख्य सचिव यांच्याकडे माहे एप्रिल-जुलै, २०२० या कालावधीत सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालभारती आणि एससीईआरटी यांनी संगनमताने केलेल्या शासकीय निधीचा गैरवापर, आर्थिक अनियमिततेबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्याकडे लेखी स्वरूपात केल्या असून या प्रकरणी सखोल चौकशी होऊन दोषींविरोधात विनाविलंब कारवाई करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याऐवजी शासनाने प्राथमिक शिक्षण परिषदेच्या (समग्र शिक्षा) राज्य प्रकल्प संचालक यांची दिनांक ११ ऑगस्ट, २०२० रोजी बदली करण्याचा निर्णय घेतला तसेच, श्रीमती आश्विनी जोशी यांना शिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांकडे कार्यभार सोपविण्याचे आदेश दिले असून त्यांची नव्याने कोठेही नियुक्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१५-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणाबाबत लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९/१२/२०२० रोजीच्या आदेशान्वये डॉ.आश्विनी जोशी, भा.प्र.से यांची सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्राप्त अहवालानुसार तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे आढळून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: नागपूर महानगरपालिकामध्ये एलबीटी कायद्यांतर्गत व्यापाऱ्यांना नोटीसा प्राप्त होत असल्याबाबत

**(२) ४७८४ (२८-०९-२०२०) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर महानगरपालिकामध्ये एलबीटी कायद्यांतर्गत व्यापाऱ्यांना सवलत देण्यासाठी पुन्हा एकदा Amnesty Scheme (कर्जमाफी योजना) आणण्याबाबतचा विचार शासनाने केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलबीटी नियमांच्या नियम ३६ मध्ये बदल करून व्यापाऱ्यांना अपील करतेवेळी भरावयाची संपूर्ण विवादित रक्कमेऐवजी कमी रक्कम भरून अपील करण्याची सवलत देण्याबाबतही शासन विचाराधीन असून याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०७-२०२१) :** (१) असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(२) अशी बाब शासनस्तरावर विचाराधीन नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य संस्थेचे अहमदाबाद येथे स्थलांतराबाबत

**(३) ४८११ (१४-१२-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने मुंबईतील आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रापाठोपाठ नागपूर येथील केंद्रीय खाण मंत्रालयाचे अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य (एनआयएमएच) संस्थेचे विलिनीकरण करुन केंद्रीय आरोग्य व परिवार मंत्रालयाचे अखत्यारितील आयसीएमआर अंतर्गत एनआयओएचमध्ये विलिनिकरण करण्याचा तसेच तेथील एनआयएमएमची सुसज्ज व भव्य प्रयोगशाळा देखील स्थलांतरीत करण्याचा गत वर्षी निर्णय घेतला असल्याचे दिनांक २६ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील ही एकमेव संस्था असल्याने नागपूर व त्यालगत असलेल्या अन्य राज्यात खाणींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने भौगोलिकदृष्ट्या सर्वांना सोईचे होईल या उद्देशाने राज्यातील सामाजिक कार्यकर्ते व मानवाधिकार अभ्यासक यांनी नागपूरहून अहमदाबाद (गुजरात राज्य) येथे सदर संस्थेचे स्थलांतर करण्यात येऊ नये अथवा सध्याचे हे कार्यालय सेंट्रल झोन म्हणून ठेवावे असे सूचित करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर येथील राष्ट्रीय खनिकर्म आरोग्य संस्थेचे महत्व लक्षात घेता, खनिकर्म आरोग्य संस्थेचे विलिनीकरण करुन अहमदाबाद येथे स्थलांतरीत करण्यात येऊ नये, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपूरावा केला आहे काय व त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थलांतरण थांबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०५-०७-२०२१) :** (१) होय.

नॅशनल इस्टिटयुट ऑफ ऑकूपेशनल हेल्थ (एन.आय.ओ.एच.) यांनी दिनांक २६/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये, एनआयएमएच चे एनआयओएच मध्ये विलिनिकरण करुन एनआयएमच चे सुसज्ज व भव्य प्रयोगशाळा जुलै, २०२० मध्ये आयसीएमआर अंतर्गत एन.आय.ओ.एच. अहमदाबाद, गुजरात येथे स्थलांतरीत केल्याचे कळविले आहे.
(२) सदर बाब निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मंत्री व राज्यमंत्री यांना लॉकडाऊन काळातील वीज देयके बेस्टने पाठवली नसल्याबाबत

**(४) ४८९६ (१४-१२-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊनमध्ये राज्यातील मंत्री व राज्यमंत्री यांच्या बंगल्यावर माहे मार्च, एप्रिल, मे, जून व जुलै, २०२० या महिन्यांची वीज देयके बेस्टने पाठवली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत सर्वसामान्य नागरिकांना आकारलेल्या अवाजवी देयकामुळे नागरिक त्रासलेले असून नोकरी नाही, कंपनी बंद होत आहेत त्यामुळे घर कसे चालवायचे या विवंचनेत असलेल्या सर्वसामान्य जनतेला वीज बिलाचा दिलासा देण्याऐवजी मंत्र्यांच्या बंगल्यांच्या वीज देयकात सवलत दिल्यामुळे राज्यातील जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे, हे ही, खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मंत्री व राज्यमंत्री यांच्या बंगल्याचे माहे मार्च ते जुलै, २०२० महिन्यातील वीज देयक न पाठवण्याची तसेच अशा प्रकारची सवलत मा.मंत्री व राज्यमंत्री यांना देण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगांने संबंधितांवर कारवाई करुन सर्वसामान्य जनतेला वीज देयकामध्ये सुट देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०६-२०२१) :** (१), (२) व (३) लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी दिनांक २६/०३/२०२० रोजी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने राज्यातील सर्व वीज वितरण कंपन्यांना (महावितरण, अदानी, टाटा, बेस्ट) प्रत्यक्ष जागेवर जाऊन मीटर रिडींग घेणे, बिल प्रिंटींग करणे, बिल वितरण करणे, नवीन वीज जोडणी देणे तसेच वीज बिल भरणा केंद्रावर वीज बिल भरुन घेणे ही कामे बंद करण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे लॉकडाऊनमध्ये माहे मार्च, एप्रिल, मे, जून व २१ जुलै, २०२० या कालावधीत राज्यातील ग्राहकांना छापील स्वरुपातील बिले पाठविणे बंद होते.

सदर कालावधीत वीज ग्राहकांना SMS (लघुसंदेश) तसेच Email व्दारे वीज बिले पाठविण्यात येत होती. मा.मंत्री अथवा मा.राज्यमंत्री यांच्या शासकीय निवासाची वीज बिले ही शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावावर असतात. सदर वीज बिले नमूद केलेल्या पत्त्यावर तसेच त्यांनी नोंदविलेल्या मोबाईल नंबरवर व ई-मेल वर पाठविण्यात येतात.

सदर वीज बिलांत कोणत्याही प्रकारची सवलत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्ष परीक्षेत विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(५) ४९५० (१८-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे बंधनकारक असताना शासनाने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेऊन मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परीक्षा रद्द झाल्याच्या मानसिकतेत असलेल्या विद्यार्थ्यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर परीक्षेची तयारी करण्यास वेळ अपुरा पडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन परीक्षेसाठी अनेक विद्यापीठांनी अनुभव व पात्रता नसलेल्या कंपन्यांना विनानिविदा कंत्राटे बहाल करुन आर्थिक अनियमितता केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या झालेल्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी निश्चित करुन आर्थिक अनियमितता केलेल्या विद्यापीठांची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-०७-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाथरी येथे सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(६) ५११२ (१४-१२-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाथरी तालुक्यातील ५६ गावातील नागरीकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन पाथरी सहाय्यक निबंधक (सहकार विभाग) कार्यालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सप्टेबर-ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.सहकार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाथरी तालुक्यासाठी स्वतंत्र सहाय्यक निबंधक कार्यालय स्थापन करुन कर्मचारी नेमणूकीबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३०-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## थोर समाजसुधारक, लोककवी, साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांची सर्वोच्च भारतरत्न पुरस्कारसाठी शिफारस करण्याबाबत

**(७) ५१४५ (१४-१२-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **राजशिष्टाचार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थोर समाजसुधारक, लोककवी, साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांची सर्वोच्च भारतरत्न पुरस्कारासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर मतदार संघ) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २८ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त मागणीवर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२९-०६-२०२१) :** (१), (२) व (३) मा.मुख्यमंत्री सचिवालय कार्यालयामध्ये शोध घेतला असता सदर निवेदन आढळून येत नाही. तसेच, सदर निवेदनाची नोंद ई-ऑफीस प्रणालीमध्ये आढळून येत नाही. मात्र, अण्णाभाऊ साठे यांची भारतरत्न पुरस्कारासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधी, मान्यवर यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदने दिली आहेत. तथापि, केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने भारतरत्न पुरस्काराबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये असे नमूद केले आहे की, “THE RECOMMENDATIONS FOR BHARATRATNA ARE MADE BY PRIME MINISTER HIMSELF TO THE PRESIDENT. NO FORMAL RECOMMENDATIONS FOR THIS ARE NECESSARY.” सदर मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मा.पंतप्रधान स्वत: मा.राष्ट्रपती महोदयांना भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारस करतात. केंद्र शासन राज्य शासनाकडून भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारशी मागवित नाही.

___________

## मुंबई परिसरातील प्रदूषित झालेल्या सर्व नदया व खाड्यातील प्रदूषण थांबविण्याबाबत

**(८) ५१६८ (१२-११-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरातील प्रदूषित झालेल्या सर्व नदया व खाड्या प्रदूषण थांबवून पुनरुज्जीवित करण्याची मागणी मच्छिमार समाज तसेच पर्यावरण वाद्यांकडून सातत्याने होत असून त्याबाबतची वस्तुस्थिती आणि शासनाची भूमिका काय आहे,

(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशातील सर्व खाड्यांवरील अतिक्रमणे हटवणे, प्रदूषण थांबवणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, तसेच स्थानिक पारंपारिक मच्छिमारांचा त्यावरील अधिकार प्रस्थापित करणे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (३०-०८-२०२१) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ११/०९/२०१९ रोजी मा.हरित लवादाच्या आदेशान्वये महानगरपालिका क्षेत्रात तयार होणाऱ्या सांडपाण्यावर पूर्णपणे प्रक्रिया करण्याविषयी कृती आराखडा सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी, दहिसर, पोईसर, ओशीवरा या नदयामध्ये येणारे सांडपाणी रोखण्यासाठी व नदयांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कृती आराखडा तयार केला असून याबाबतची अंमलबजावणी सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पोलिसांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ५१७५ (१८-११-२०२०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात वाढीस लागलेले गुन्हे, महिला व तरुणींवर होणारे अत्याचार, खून या सारख्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेची गंभीर समस्या निर्माण झाली असून मुंबईच्या सव्वाकोटी लोकसंख्येच्या सेवेसाठी केवळ ४० हजार पोलीस कार्यरत असल्याने मुंबईत वाढत्या गुन्ह्यांमुळे पोलिसांवर कामाचा ताण येवून मुंबई पोलीस विविध आजारांना बळी पडत आहेत, तसेच हृदयविकाराने मृत्यूमुखी पडण्याचे प्रकार घडत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई पोलीस विभागासाठी मंजूर पदांपैकी १९ ते २० टक्के पदे रिक्त आहेत व यात सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या पदांमध्ये सर्वाधिक ४१ टक्के तफावत आहे तर महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रमाणही कमी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) मुंबईत साडेतीनशे मुंबईकरांमागे एक पोलीस असल्याचे एका खाजगी संस्थेच्या अहवालातून माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई पोलिसांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०१-०७-२०२१) :** (१) व (२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे ५१,२५९ पदे मंजूर असून ४४,२०० पदे कार्यरत आहेत व ७०५९ (१३.७७%) पदे रिक्त आहेत. जानेवारी ते नोव्हेंबर, २०२० पर्यंत एकूण २१६ पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे निधन झाले असून, त्यापैकी ११ पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे हृदयविकाराने निधन झाले आहे. सहायक पोलीस निरीक्षक यांची एकूण १०९३ पदे मंजूर असून ९६१ पदे कार्यरत आहेत व १३२ (१२.०७%) पदे रिक्त आहेत. महिला पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे प्रमाण १२.६६% आहे.
(३) याबाबतची माहिती मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाच्या अभिलेखी उपलब्ध नाही.

(४) शासन निर्णय, सा.प्र.वि. दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रातील सूचनांनुसार पदोन्नती कोटयातील मागासवर्गीयांची पदे रिक्त ठेवण्याचे निर्देश असल्याने पोलीस नाईक ते सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील २३६४ पदे रिक्त आहेत. सन २०१९ मध्ये मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस शिपाई संवर्गातील पदांसाठी जाहिरात देण्यात आलेली आहे. राज्यातील पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील (सरळसेवा) रिक्त पदांच्या भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जानेवारी, २०२० मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(१०) ५२७९ (२५-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून शासनाची फसवणूक होत असल्याप्रकरणी चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करण्याबाबत दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी बातमी प्रसिध्द झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक २७ ऑगस्ट, २०२० रोजी पत्र पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनामार्फत केव्हापर्यंत चौकशी करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०८-२०२१) :** (१) व (२) दैनिक लोकसत्ता या वृत्तापत्रात या आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती. तथापि, या बातमीचा उल्लेख असलेल्या आशयाचे पत्र अभिलेखात आढळून येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) येथे बस स्थानकाचे नुतनीकरण करणेबाबत

**(११) ५४५० (१३-१२-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथे बस स्थानकाचे सुधारित अंदाजपत्रक करुन नुतनीकरण करण्यात येणार आहे काय, याबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (११-०८-२०२१) :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाच्या रत्नागिरी विभागातील दापोली येथील बसस्थानक नुतनीकरण या कामाच्या ई-निविदा महामंडळाच्या दिनांक २१/०१/२०२१ च्या पत्रान्वये मागविण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळातील शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत

**(१२) ५४५७ (१८-११-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच विशेष शाळांचे वार्षिक वेळापत्रक, कामाचे दिवस व तास, सुट्टयांचे नियोजन आणि दैनंदिन वेळापत्रक, वेतनप्रणाली शालार्थ ऐवजी सेवार्थमध्ये हस्तांतरीत करणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा वाढवाव्यात, पदवीधर शिक्षक, कला क्रीडा शिक्षक यांना पदवीधर

वेतनश्रेणी लागू करणे, पदोन्नतीने मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणे या मागण्या शिक्षक भारती विशेष शाळा व कर्मशाळा विभागाचे अध्यक्ष श्री.विजय साबळे यांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सर्व अपंगांच्या शाळांच्या परवान्याचे नुतनीकरण करण्याच्या मागणीबाबत कार्यवाही न केल्यामुळे अनेक संस्था शाळा बंद करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१२-०७-२०२१) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) येथे दापोली नगरपंचायत हद्दीमध्ये नाट्यगृह उभारण्याबाबत

**(१३) ५५३३ (१४-१२-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथे नगरपंचायत हद्दीमध्ये नाट्यगृह उभारण्यासाठी दापोली नगरपंचायतीने शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार उक्त ठिकाणी नाट्यगृह उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) दापोली, जि.रत्नागिरी येथे नगरपंचायत हद्दीमध्ये नाट्यगृह उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही नगरपंचायत स्तरावर सुरु असल्याची बाब दापोली नगरपंचायतीने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रदूषित नद्यांच्या प्रस्तावासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(१४) ५५४३ (१२-११-२०२०) श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ९१७ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रामध्ये जवळजवळ ४० नद्यांचे पट्टे प्रदूषित झाले असून त्यातील २१ नद्यांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या निती आयोगाकडे पाठविले आहेत, तसेच, सदरहू नद्यांच्या प्रस्तावासाठी ३ हजार ८०० कोटींची मागणी निती आयोगाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नद्यांच्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू प्रस्तावास मंजुरी केव्हा मिळणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (३०-०८-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यातील नदी संवर्धनाबाबत निती आयोगाकडे दिनांक दिनांक २८ जून, २०१९ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्य़ात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ०६/११/२०२० च्या पत्रान्वये निती आयोगाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

---

## मुंबईसह संपूर्ण राज्यात वीज महावितरण कंपनीने ग्राहकांना भरमसाठ दराने वीज देयके आकारल्याबाबत

**(१५) ५५४४ (१७-११-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामनिवास सिंह, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.नरेंद्र दराडे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह संपूर्ण राज्यात विशेषत: वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, लातूर, कोकणासह रायगड येथे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जनता टाळेबंदीमुळे घरात असल्याने सद्य:स्थितीत कामधंदा, रोजगार, नोकरी बंद असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले असताना तसेच निसर्ग चक्रीवादळाच्या संकटातून सावरत असतानाच माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान वीज महावितरण कंपनीने ग्राहकांना भरमसाठ दराने वीज देयके पाठवून देयके न भरलेल्या ग्राहकांची वीज जोडणी तोडण्यात आल्यामुळे तसेच अनेकांनी वाढीव वीज देयकाच्या धक्याने आत्महत्या केल्यामुळे वीज ग्राहकांना मदत व न्याय मिळण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात महावितरण कंपनी विरोधात तीव्र नाराजी पसरली असून सदर वाढीव देयकासंदर्भात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने योग्य प्रमाणात प्रत्यक्ष मीटर रिडींग घेऊन किंवा वीज देयकात सुट देवून ग्राहकांची होणारी लुट थांबवुन सुधारित वीज देयक देण्याबाबत ग्राहकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळेबंदी काळातील तीनशे युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांची वीज देयके माफ करावी तसेच उक्त देयकांची आर्थिक भरपाई शासनाने करावी इत्यादी मागण्यांसाठी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्यभरातील वीज महावितरण जिल्हा कार्यालयांना टाळेठोको आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाढीव वीज दरात सुट देण्याबाबत किंवा उक्त देयकांची आर्थिक भरपाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२८-०६-२०२१) :** (१) दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजी मा.लोकप्रतिनिधी श्री.प्रविण दरेकर यांचे लेखी पत्र प्राप्त झाले आहे.
(२) वीज देयकांबाबत महावितरणला जून, २०२० पासून दिनांक २६/११/२०२० पर्यंत ७,७४,६७१ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ७,३८,६११ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महावितरणव्दारा देण्यात आलेली देयके मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाव्दारे निर्धारित वीज दरानुसार आहेत. घरगुती वीज ग्राहकांना देण्यात आलेल्या सुविधामध्ये तीन सुलभ हप्त्यामध्ये वीज बिल कोणत्याही विलंब आकार वा व्याज न आकारता भरणा करण्याची सोय व ज्या घरगुती ग्राहकांचे लॉकडाऊननंतर प्रथमच प्रत्यक्ष मीटर वाचनाप्रमाणे बिल झाले आहे, अशा महावितरणच्या ग्राहकांनी त्यांचे संपूर्ण वीज बिल देय दिनांकापूर्वी भरले तर त्यांना देय रकमेवर २% सवलत अनुज्ञेय केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या नवीन वीज धोरणाबाबत

**(१६) ५७१० (२३-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणारे ग्राहक, उद्योगांना स्वस्त दरात वीज पुरवठा तसेच वीज उत्पादनाचे खर्चात कपात व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांचा देखभाल दुरुस्ती खर्च कमी करणे, कृषी ग्राहकांना दिवसा वीज उपलब्ध करुन देणे त्याचबरोबर राज्यात मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा निर्मिती करणे यासंदर्भात नवीन वीज धोरण ठरविण्याबाबत १३ सदस्यांची विशेष समिती स्थापन करण्याबाबत दिनांक २२ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत तसेच तीन आठवड्याच्या विहित मुदतीनंतर म्हणजेच माहे मे, २०२० च्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात समिती अहवाल शासनास सादर होऊ न शकल्यामुळे शासनाने या समितीस १ महिन्याची मुदतवाढ दिल्याचे दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या ग्राहकांना शासन मोफत वीज देऊन त्यापुढील युनिट वापरणाऱ्या ग्राहकांना स्वस्तात वीज पुरवठा करणार असल्याचे मंत्री महोदय यांनी जाहीर करुनही या समितीचा अहवाल वेळेत सादर होऊ न शकल्यामुळे गरिब ग्राहकांना स्वस्तात वीज पुरवठा होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्य राज्यांनी टाळेबंदीत झालेल्या नुकसानीकरीता दिलासा देण्यासाठी वीज देयकात सवलती देण्याच्या घेतलेल्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र शासनही तशा प्रकारचा निर्णय घेणार आहे का तसेच १०० युनिटपर्यंत मोफत वीज पुरवण्याच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करणार आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तुत समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, केव्हा,

(५) असल्यास, १०० युनिटपर्यंत वीज घरेलु ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२८-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे. राज्य शासनाचे वीज धोरण ठरविण्यासाठी ऊर्जा प्रभागाच्या दिनांक २२ एप्रिल, २०२० च्या शासन निर्णयान्वये १३ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. सदर समितीच्या कार्यकक्षेत ०-१०० युनिटपर्यंत वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज देणे या विषयांसोबत वीज उत्पादनाचा खर्च कमी करण्याकरीता उपाययोजना सुचविणे, शासकीय वीज कंपन्यांचा ओ ॲण्ड एम खर्च कमी करणे, महावितरण कंपनीची तांत्रिक व वाणिज्यिक वीज गळती कमी करणे, महापारेषण कंपनी ट्रान्समिशन चार्जेस कमी करणे, उद्योगाचे वीजदर कमी करण्याबाबत उपाययोजना सुचविणे, सौर ऊर्जा निर्मितीला प्राधान्य देणे, सुत गिरणी व यंत्रमाग उद्योगांच्या वीज दरात सवलत देण्याबाबत उपाययोजना सुचविणे इ. विषयांचा समावेश आहे. या सर्व विषयांची व्याप्ती पाहता व कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर सदर समितीव्दारा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. सध्या १०० युनिट पेक्षा कमी वीज वापरण्याचा एमईआरसीने प्रमाणित केलेल्या दराने वीज पुरवठा चालू आहे.

(३), (४) व (५) टाळेबंदी काळातील घरगुती वीज ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याबाबत तसेच ०-१०० युनिटपर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबत अंतिम निर्णय झाला नसून शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिव्यांग शाळेतील अतिरिक्त झालेल्या कमर्चाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत

**(१७) ५७१२ (१४-१२-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनेक दिव्यांग शाळा अनुज्ञप्ती व इतर कारणामुळे बंद झाल्या असून अनेक कर्मचारी अतिरिक्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन अद्यापपर्यंत झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१२-०७-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ज्या दिव्यांगांच्या विशेष शाळा अनुज्ञाप्ती व इतर कारणामुळे बंद झाल्या आहेत, त्या शाळांच्या अपिलांवर शासनस्तरावर सुनावणी घेऊन अपील अमान्य केलेली आहेत त्या शाळा व कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहे, २०१८ मध्ये दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या समायोजनाच्या प्रतिक्षा यादीवर नावे नोंदविण्यात आली आहेत. यामधील सन मे, २०१८ मध्ये १२३ व सप्टेंबर, २०१८ मध्ये १३६, एप्रिल, २०१८ मध्ये ९९ कर्मचाऱ्यांचे समायोजनाचे आदेश आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोकरंबा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील हरभरा खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट होत असल्याबाबत

**(१८) ५७५६ (१३-११-२०२०) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरंबा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील हरभरा खरेदी केंद्र हे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व शेतीमाल आधारभूत किंमतीने खरेदी करण्याकरीता शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे, परंतु सदर केंद्रावर शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी करत असताना मोठ्या प्रमाणात लूट केली जात असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोकरंबा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील ॲरोमा ऑरगॅनिक ॲग्रो प्रोडयूसर कंपनीच्या हरभरा आधारभूत केंद्रावर शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी करीत असताना अडवणूक करून कंपनीचे एक हजार रुपयांचे शेअर्स

घेण्याचे बंधनकारक केले असून शेतकऱ्यांची इच्छा नसताना केवळ कंपनीचे भाग भांडवल वाढविण्यासाठी शेअरच्या रूपामध्ये शेतकऱ्यांची लूट केली जाते, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर हरभरा खरेदी केंद्रावर होणारी लूट रोखण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-०८-२०२१)** : (१), (२) व (३) मा.श्री.रमेश कराड, विधान परिषद सदस्य यांनी दिनांक २९/५/२०२० व श्री.गंगाधर होळकर, कारेपूर, रेणापूर यांनी दिनांक १/६/२०२० रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १/६/२०२० च्या आदेशान्वये अप्पर जिल्हाधिकारी, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे. सदर त्रिस्तरीय समितीमध्ये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर व तहसिलदार, रेणापूर यांचा समावेश होता. समितीने प्रत्यक्ष खरेदी केंद्रास भेट देऊन चौकशी करुन दिनांक १०/६/२०२० रोजी चौकशी अहवाल जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे सादर केला आहे.

संस्थेने कंपनी कायद्यातील तरतूदींच्या अधीन राहून इच्छुक सभासद भागधारक शेतकऱ्यांना समभाग (Equity Shares) वितरित केले आहेत. त्यामुळे भागधारक शेतकऱ्यांची संस्थेमध्ये मालकी प्रस्थापित झाल्याचे चौकशी अहवालाव्दारे निदर्शनास आले आहे.

संस्थेने शेतकऱ्यांकडून FAQ दर्जाचा शेतमाल खरेदी करताना केवळ शासनाने निर्धारित केलेले खर्च घेण्याबाबत तसेच इतर कोणत्याही स्वरुपाच्या रकमा शेतकऱ्यांकडून घेता येणार नाहीत याबाबत सूचित केले आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांना समभाग परत हवे आहेत अशा शेतकऱ्यांना समभाग परत देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासन मान्य अशासकीय चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्‌यालयांना १००% वेतन अनुदान देणेबाबत

**(१९) ५७८८ (१३-१२-२०२०) श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन मान्य अशासकीय चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्‌यालयांना ९०% ऐवजी १००% वेतन अनुदान देण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, अद्‌याप निर्णय न होण्याची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१२-०७-२०२१) :** (१) व (२) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार राज्यातील अशासकीय अनुदानित चित्रकला व औषध निर्माण शास्त्र महाविद्‌यालयांना ९०% वेतन अनुदान अनुज्ञेय आहे. तसेच राज्यातील अनुदानित अध्यापक महाविद्‌यालयांना १००% वेतन अनुदान अनुज्ञेय करण्यात आले आहे.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय व खाजगी संस्थांच्या आश्रमशाळेतील विद्‌यार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याबाबत

**(२०) ५९४० (१४-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी मुलांच्या शिक्षणाबरोबर त्यांच्या सकस जेवणाची सोय व्हावी या उदात्त हेतूने शासनाने आदिवासी बहूल भागात निवासी आश्रमशाळा सुरू केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहूल व नक्षलग्रस्त जिल्हा घोषित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी बहूल जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा व इतर सर्व शाळा बंद ठेवण्यात आल्या असून जिल्हा परिषदेच्या आदिवासी विद्यार्थ्यांना सकस आहार उपलब्ध करून दिला जात असून शासकीय व इतर खाजगी ९२ शाळांमधील विद्यार्थ्यांना सकस आहार मागील ४ महिन्यांपासून उपलब्ध करून देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविण्याबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (११-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, नामांकीत शाळा, शासकीय वसतिगृहे व स्वयंयोजना या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहाराकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागामार्फत नाकारण्यात आला आहे.

---

## बोईसर-तारापूर औदयोगिक (जि.पालघर) वसाहतीत प्रदूषण होत असल्याबाबत

**(२१) ५९६३ (०१-१२-२०२०) श्री.रामनिवास सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर-तारापूर औदयोगिक वसाहत (जि.पालघर) येथे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरहू वसाहतीत होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरीता तारापूर बोईसर एमआयडीसीतील कारखान्यांना आणि प्रशासकीय यंत्रणेला मा.पालकमंत्र्यांनी एक महिन्याची मुदत दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार प्रदूषण करणाऱ्या उक्त औदयोगिक वसाहतीतील कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योगांचे सन २०१९-२०२० मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार दोषी आढळणाऱ्या १०२ उद्योगांवर तसेच सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेवर रुपये १६० कोटी इतकी पर्यावरण नुकसान भरपाई देण्याबाबत डिसेंबर, २०१९ दरम्यान नोटीसा देण्यात आल्या आहेत. तसेच दोषी आढळलेले ९८ कारखाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बंद करण्यात आले आहेत.

सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा व्यवस्थित न चालविल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत क्र. ३३८/२०१०, २६१/२०१७ व १९६/२०१८ अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तारापूर औद्योगिक वसाहतीमधल उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पुन्हा पाहणी करण्याचे काम प्रगतीपथावर असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमती पत्रातील अटी व शर्तीची पूर्तता न केल्यास सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बंद का करण्यात येऊ नये व या प्रक्रिया यंत्रणेत सांडपाणी सोडणाऱ्या उद्योगांना बंद का करण्यात येऊ नये याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत तारापूर औद्योगिक वसाहतीत निर्माण होणाऱ्या सांडपाण्यामध्ये कपात करण्यात आली आहे.

दिनांक २२/११/२०२० पासून नवीन सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असल्यामुळे १७ द.ल.लि. पैकी ९ द.ल.लि. इतक्या सांडपाण्यावर पूर्ण प्रक्रिया करण्यात येत आहे.

जुन्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमध्ये देखील सुधारणा व अद्ययावतीकरण करण्याचे काम सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे सामूहिक सांडपाणी यंत्रणेने बंदी आदेश दिल्याने ७ ते ८ द.ल.लि. सांडपाणी निर्मिती कमी होऊन संबंधित उद्योगांनी स्वत: बंदी केलेली आहे.

तारापूर औद्योगिक परिसरातील प्रदूषणाच्या अनुषंगाने मा.हरित लवाद यांच्याकडे याचिका क्र. ६४/२०१६ दाखल प्रकरणी मा.लवादाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडा बनवून त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महापालिकेतील ऐवजदार कर्मचाऱ्यांना लाड समितीच्या शिफारशीचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(२२) ५९६८ (१४-१२-२०२०) श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महापालिकेत कार्यरत असणाऱ्या ऐवजदार कर्मचाऱ्यांना लाड समितीच्या शिफारशींचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐवजदारांची पदे मृत्यूनंतर व्यपगत न होता त्यांच्या वारसदारांना ऐवजदार कार्ड मिळण्याकरीता शासनाने नियमात सुधारणा करण्याबाबत नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी सुधारणा सुचविल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने २० वर्षे पूर्ण झालेल्या ऐवजदार कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घ्यावे तसेच पदे व्यपगत होऊ नये याकरीता ऐवजदारांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नातेवाईकांकरीता कार्ड सुरु राहण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०६-२०२१)** : (१) नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील “ऐवजदार” म्हणून काम करत असलेले कर्मचारी हे रोजंदारीवर काम करीत असल्याने, या कर्मचाऱ्यांना लाड-पागे समितीच्या शिफारसी लागू ठरत नाहीत.

(२), (३) व (४) नागपूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील ऐवजदार कर्मचाऱ्यांच्या संदर्भात, शासनस्तरावर कोणतेही नियम अस्तित्वात नाहीत, त्यामुळे अशा नियमात सुधारणा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, नागपूर महानगरपालिकेत कार्यरत ऐवजदार कर्मचाऱ्यांपैकी ज्यांची सेवा २० वर्षापेक्षा जास्त झालेली आहे, अशा कर्मचाऱ्यांना नागपूर मनपाच्या सेवेत सामावून घेण्यासंदर्भात, “विशेष बाब” म्हणून, दिनांक २०/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये “अधिसंख्य” पदे निर्माण करण्यास काही अटी व शर्तीवर मंजुरी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार, नागपूर मनपाने, आतापर्यंत ३४६३ पात्र ऐवजदारांना सामावून घेण्याची कार्यवाही केलेली आहे व अशा अधिसंख्य कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्ती / मृत्यू / वैद्यकिय अपात्र / ऐच्छिक सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या जागेवर वारसाहक्क मिळणेबाबत स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेकडे पाठपुरावा केला आहे. तथापि, या मागणीसंदर्भात कोणतीही तरतूद नसल्याचे, नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

## मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स-२०१८ च्या परिषदेबाबत

**(२३) ६०१३ (१४-१२-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अत्याधुनिक उद्योगाला आणि उत्पादनाला चालना मिळावी, रोजगारांची वाढ व्हावी, पायाभूत सुविधांचा विकास व्हावा, इतर राज्यातील प्रकल्पात गुंतवणूक व्हावी या उद्देशाने मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स-२०१८, दिनांक १८ ते २० फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत मुंबईत राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत गुंतवणूकीचे किती रकमेचे किती प्रस्ताव मान्य झाले व परिषदेसाठी किती खर्च आला,

(२) असल्यास, राज्यात प्रत्यक्षात किती गुंतवणूक झालेली आहे व त्याचा विनियोग कशाप्रकारे करण्यात आला,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०७-०७-२०२१) :** (१) मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स-२०१८, दिनांक १८ ते २० फेब्रुवारी,२०१८ या कालावधीत मुंबईत राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत राज्यात विविध क्षेत्रात ३,९६५ गुंतवणूक प्रस्ताव (Investment Intentions) करण्यात आले. त्याव्दारे रुपये १२ लक्ष कोटी गुंतवणूक व ३७ लक्ष रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. त्यापैकी उद्योग विभागामार्फत ३,८४३ गुंतवणूक प्रस्ताव करण्यात आले, त्यात रुपये ५.७५ लक्ष कोटी गुंतवणूक व ७.१४ लक्ष रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

सदर परिषदेसाठी एकूण रक्कम रुपये ६८,३७,१९,९२५/- इतका खर्च झाला आहे.

(२) मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हर्जन्स-२०१८ या परिषदेत करण्यात आलेल्या गुंतवणूक करारामधून अद्यापपर्यंत एकूण रुपये ४५,४२७/- कोटी इतक्या रक्कमेची प्रत्यक्षात गुंतवणूक झालेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरप व कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) गावातील शेतकऱ्यांचे विकासकाने नुकसान केल्याबाबत

**(२४) ६१४६ (२०-११-२०२०) श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरप (ता.कल्याण, जि.ठाणे) गावातील १३ एकर शेतातील उभ्या पिकांवर थरवाणी या विकासकाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास बुलडोझर फिरवून शेत पिकांचे नुकसान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावातील शेतकरी आणि विकासक यांचा वाद न्यायालयात प्रलंबित असून त्याबाबतचा निर्णय येण्यापूर्वीच विकासकाने रात्रीच्या वेळी शेतातील उभे पीक उद्ध्वस्त केल्याची तक्रार शेतकऱ्यांनी मांडा पोलीस स्थानकात दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) गावाजवळील वाघेरेपाडा येथील तीन शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांवर व कापणीच्या गवतावर ट्रॅक्टर व जेसीबी फिरवून ते नष्ट केल्याची तक्रार माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शेतकऱ्यांनी मांडा टिटवाळा पोलीस ठाण्यात केली असून शेतकऱ्यांचे प्रत्येकी २० गुंठे शेतातील पिकांचे प्रत्येकी लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा पीक उद्ध्वस्त केल्याप्रकरणी विकासकावर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१२-०७-२०२१) :** (१) व (२) श्री.मोहन थारवाणी यांनी श्री.दिलीप भोईर व इतर ९ यांचेविरुध्द वरप येथील जमिनीत अडथळा आणू नये म्हणून दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर कल्याण येथे सिव्हिल सूट १६९/२०२० दिनांक ०१/०७/२०२० रोजी दाखल केले आहे. सदर प्रकरणी दिनांक ०३/०९/२०२० रोजी झालेल्या सुनावणी वेळी काही प्रतिवादी गैरहजर असल्याने पुढील तारखेपर्यंत वादी यांना अडथळा आणू नये असे आदेश मा.न्यायालयाने पारीत केले आहेत.

श्री.दिलीप बळीराम भोईर रा.वरप, ता.कल्याण, जि.ठाणे यांचे दिनांक १४/१०/२०२० च्या तक्रारीनुसार कल्याण तालुका पोलीस ठाण्यात मोहनशेठ थरवाणी यांच्या सांगण्यावरुन भात कापणारे व भातावर औषध टाकून नुकसान करणारी अनोळखी माणसे व मोहनशेठ थरवाणी यांच्याविरुध्द अदखलपात्र गुन्हा क्र.२४९०/२०२० भा.द.वि. कलम ४२७,१०९,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. तथापि, अर्जदार यांच्या तक्रार अर्जात पिकांवर बुलडोझर फिरवल्याबाबत तक्रार केलेली नाही.
(३) व (४) श्री.सुरेश हिंदोडा व इतर २ शेतकऱ्यांच्या दिनांक २६/१०/२०२० रोजीच्या तक्रारीनुसार कल्याण तालुका पोलीस ठाण्यात श्री.प्रकाश बुधराणी व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिनांक २५/१०/२०२० रोजी रात्रीच्या वेळी कांबा वाघेरेपाडा ता.कल्याण येथील स.नं.४७/१, १२० गुंठे शेतजमिनीवर लावण्यात आलेले

विविध पीक व गवत ट्रॅक्टर व जेसीबी मशिनने नष्ट करुन अर्जदाराचे एक लाखाचे नुकसान केल्याबाबत तक्रार अर्ज केला आहे. सदर तक्रार अर्जाची कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे स्थानिक अर्ज क्र.१०२२/२०, १०२३/२० व १०२४/२० अशी नोंद आहे.

अर्जदार यांना वेळोवेळी अर्ज चौकशीस हजर राहण्याबाबत कळवून देखील हजर राहिले नाही. त्यामुळे त्यांना त्यांच्या तक्रार अर्जात कोणतेही स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तरी अर्जदार हे तक्रार अर्जाच्या अनुषंगाने त्यांचे म्हणणे मांडण्यास हजर झाल्यास त्यांचे म्हणणे नोंदवून रितसर कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील शिक्षकांच्या वेतनाबाबत

**(२५) ६१५८ (१३-१२-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील इंग्रजी माध्यमांच्या शाळा कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे आर्थिक संकटात असून अशा शाळेमधून काम करणाऱ्या १० लाख कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न संस्था चालकांसमोर निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळांचा सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ चा आरटीई प्रवेशाचा परतावा संबंधित शाळांना मिळाला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामीण भागातील छोट्या-मोठ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील कर्मचारी आणि संस्थाचालकांना आरटीई शुल्काचा परतावा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१७-०२-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) शासनस्तरावर नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गिधाडांच्या संवर्धनाबाबत

**(२६) ६१८८ (१४-१२-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यावरणाचा ऱ्हास, खाद्याची कमतरता, मानवी हस्तक्षेपामुळे हरवलेला अधिवास, यामुळे राज्यात मेलेले प्राणी खाऊन स्वच्छतादूत म्हणून काम करणाऱ्या गिधाडांची संख्या कमी होत असून राज्यात केवळ ८०० गिधाडांची संख्या नोंदवलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या गिधाडांच्या संवर्धनासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) महाराष्ट्र राज्यात गिधाड पक्ष्यांची तांत्रिक पध्दतीने प्रगणना करण्यात आलेली नसल्याने गिधाडांची संख्या निश्चितपणे सांगता येणार नाही.
(२) डायक्लोफेनेक या औषधीचा वापर पाळीव प्राण्यांवर औषधोपचारासाठी होणे हे गिधाडा या पक्ष्याचे अस्तित्व धोक्यात येण्यामागचे मुख्य कारण आहे. डायक्लोफेनेक या औषधीचा वापर पाळीव प्राण्यांच्या वापरावर तसेच डायक्लोफेनेकचे मल्टीडोज वायलच्या विक्रीवर देखील केंद्र शासनाने बंदी घातली आहे.

गिधाड पक्ष्याच्या संवर्धनासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जागतिक वन दिन, जागतिलक पर्यावरण दिन व वन्यजीव सप्ताहामध्ये पाळीव प्राण्यांवर डायक्लोफेनेक या औषधीचे वापरास आळा घालण्यासाठी जनजागृती करण्यात येते.

- प्रत्येक वर्षी माहे सप्टेंबरच्या पहिल्या शनिवारी राज्यस्तरावर जागतिक गिधाड संवर्धन जनजागृती दिवस साजरा केला जातो.
- गिधाडांची घरटी असलेल्या जागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येते.
- गिधाडांना मृत जनावर खातांना पाळीव प्राणी जसे कुत्र्यांपासून त्रास होणार नाही यासाठी Vulture Restaurant व मचाणी तयार करण्यात आलेले आहेत.
- गावातील मृत पाळीव प्राण्यांची पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून तपासणी करुन सदर मृत जनावर Vulture Restaurant व मचाणीवर गिधाडांच्या खाद्यांसाठी (Diclofenac प्रभावित नसलेल्या पाळीव प्राण्यांचे मृत शरीर) दिले जाते. त्यासाठी जनावराचे मालकास रुपये ५००/- प्रति मृत जनावर प्रमाणे देण्यात येतात.
- गिधाड वास्तव्य असलेल्या क्षेत्रात नियमितपणे परिक्षेत्रातील अधिनस्त कर्मचारी गस्त करतात.
- स्थानिकांमध्ये गिडाधमित्र म्हणुन नेमण्यात आलेले आहेत.
- गिधाड पक्ष्यांचे संरक्षण व संवर्धनकरीता Action Plan for Vulture Conservation in India २०२०-२०२५ तयार करण्यात आले असून गिधाडांचे अस्तित्व व आढळ असलेल्या क्षेत्रात क्षेत्रियस्तरावर गिधाडांचे संवर्धन व संरक्षणाबाबत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भातील उद्योग विद्युत जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(२७) ६२५५ (१४-१२-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात १०१४ उद्योग गत तीन वर्षापासून विद्युत जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगांना वाव देण्यासाठी शासनाकडून एक खिडकी योजनेमधून सर्व कामे होतील असे सांगण्यात आले असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व उद्योगांना मैत्री पोर्टलच्या माध्यमातून अर्ज करून दोन-तीन वर्षापूर्वी या उद्योगांनी मागणी नोंदविली असतानाही महावितरणकडून जोडणी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू उद्योगांना विनाविलंब वीज जोडणी तसेच सदरहू वीज जोडणी देण्यास विलंब झाल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याविरोधात जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, याबाबतचे वृत्त दिनांक ६/१०/२०२० रोजी लोकमत, नागपूर वृत्तपत्रात प्रकाशित झाले होते. विदर्भ प्रादेशिक विभागात माहे ऑक्टोबर, २०२० अखेर नवीन औद्योगिक वीज जोडणीकरीता २३६ ग्राहकांनी निर्धारित रकमेचा भरणा केलेला आहे. त्यापैकी पायाभूत सुविधांची उभारणीची आवश्यकता असणाऱ्या १३९ अर्जदारांची कामे प्रगतीपथावर असून ९७ अर्जदारांना माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्राप्त १४ परिपूर्ण अर्ज (ए-१) मंजूरी प्रक्रियेत आहेत.
(२) हे खरे नाही. नविन वीज पुरवठ्यासाठीचा परिपूर्ण अर्जासह निर्धारीत रक्कमेचा भरणा प्राप्त झाल्यानंतर महावितरण कंपनीतर्फे तात्काळ विद्युत पुरवठा देण्यात येतो.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकवली नगरपंचायत (जि.सिंधुदुर्ग) येथील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) ६३८१ (१७-०३-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कणकवली नगरपंचायत (जि.सिंधुदुर्ग) येथील काही कर्मचारी सेवानिवृत्त तर काही कर्मचाऱ्यांच्या अन्यत्र बदल्या झाल्यामुळे त्यांच्या जागी नवीन कर्मचारी देण्यात आले नसल्याने शहरातील जनतेची प्रशासकीय कामे होण्यास नाहक विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कणकवली नगरवासियांना गतिमान प्रशासन मिळून त्यांची कामे जलदगतीने मार्गी लागण्यासाठी कणकवली नगरपंचायतीच्या मंजूर स्टाफ पटर्न मधील सर्व रिक्त पदे विनाविलंब भरण्याची मागणी नगराध्यक्ष, कणकवली नगरपंचायत यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तसेच लेखी निवेदनाव्दारे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कणकवली नगरपंचायतसाठी मुख्याधिकाऱ्यासह अन्य कोणकोणत्या संवर्गातील किती व कोणकोणती पदे शासनाने मंजूर केली आहेत व सदर मंजूर पदापैकी किती व कोणकोणती पदे किती कालावधीपासून रिक्त आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०६-२०२१)** : (१) कणकवली नगरपंचायतीतील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती आणि बदल्यांमुळे झालेल्या रिक्त पदांमुळे काही प्रमाणात प्रशासकीय कामांमध्ये विलंब होत असल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कणकवली नगरपंचायतींतर्गत मुख्याधिकारी हे पद वगळता काही पदे राज्यस्तरीय संवर्गातील असून त्यांचे नियुक्ती प्राधिकारी हे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय असल्याने त्यांना आढावा घेऊन रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उर्वरित नगरपरिषद आस्थापनेवरील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेतील उद्यानाच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२९) ६४९२ (१७-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेतील उद्यानाच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०८-२०२१) :** (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील परिमंडळनिहाय उद्यानांचे संवर्धन, संरक्षण व देखभाल दुरूस्ती विषयक काम करणाऱ्या मे.हिरावती एंटरप्रायजेस व मे.एन.के.शहा इन्फ्राप्रोजेक्ट या कंत्राटदाराने उद्यान व स्थापत्य विषयक कामांची कार्यपुर्ती झालेली नसताना, सदर कामाचे त्रैमासिक देयक सादर करून नवी मुंबई महानगरपालिकेकडून देयकाची रक्कम प्राप्त करून घेतल्याचे निदर्शनास आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी कंत्राटदाराच्या कामाचे मुल्यमापन करणेकरीता दिनांक २४/०९/२०२० रोजी गठीत केलेल्या समितीच्या प्राप्त निरीक्षण अहवालातील निष्कर्षाचा अभ्यास करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणेकरीता दिनांक २२/१०/२०२० रोजी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर समितीने दिनांक २९/१०/२०२० रोजी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दिनांक ०५/१२/२०२० अन्वये मे.एन.के.शहा इन्फ्राप्रोजेक्ट व मे.हिरावती एंटरप्रायजेस यांच्यावर दंडात्मक रक्कम आकारणी करण्यात आली असून, सदर कामाचे कंत्राट रद्द करण्यात आलेले आहे.

सदर आदेशाविरूध्द कंत्राटदाराने मा.उच्च न्यायालयात दाखल याचिकेचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने लवादाची नेमणूक केली. सदर लवादाने कंत्राटदाराच्या बाजूने निकाल दिल्याने त्याविरूध्द महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सदर प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेतील उद्यान विभागातील एकूण १४ अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक ०४/११/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. उद्यान अधिकारी, सहायक उद्यान अधिकारी व उद्यान अधीक्षक यांना दिनांक ०५/१२/२०२० अन्वये निलंबित करण्यात आले होते.

त्यांचे निलंबन आदेश दिनांक २५/०५/२०२१ अन्वये विभागीय चौकशीच्या अधीन राहून संपुष्टात आणले आहेत.

एकूण ०९ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी करणेच्या दृष्टीने दोषारोपपत्र बजावण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनेक गावात मोबाईल व इंटरनेट सेवेचा अभाव असल्याबाबत

**(३०) ६६७६ (१७-०३-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४७८८८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंदाजे २८०० गावांमध्ये मोबाईल कनेक्टीविटीचा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण व इतर सुविधा मिळत नसल्याने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ब्रॉडबॅड मिशन कार्यक्रमांतर्गत इंटरनेट सेवा उपलब्ध नसलेली गावे इंटरनेट सेवेने जोडण्याकरीता शासनाने केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०४-२०२१)** : (१) सदर विषय केंद्र शासनाच्या दुरसंचार विभागामार्फत हाताळला जातो. दुरसंचार विभागाने कळविल्याप्रमाणे सुमारे २८०० गावामध्ये मोबाईल कनेक्टीविटीचा अभाव आहे हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ब्रॉडबॅड मिशन कार्यक्रमांतर्गत देशातील सर्व गावे २०२२ पर्यंत इंटरनेटनी जोडण्याचा उद्देश आहे. त्यामध्ये सदर मोबाईल इंटरनेट सेवा उपलब्ध नसलेली गावे केंद्र शासनाच्या दूरसंचार विभागामार्फत जोडण्याची कार्य विचारात घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेकरीता सोयी सुविधा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) ६८३४ (०४-०२-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गावखेड्यात छोटे-मोठे तंटे मिटवून गावात शांतता व सुव्यवस्था रहावी यासाठी शासनाने १३ वर्षापूर्वी लोककल्याणाकरीता चालू केलेली महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना निधीची कमतरता व मार्गदर्शनाचा अभाव यामुळे विस्कळीत झाल्याने बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांचा भार हलका करण्यासाठी चालू केलेल्या महात्मा गांधी तंटामुक्त योजनेला सर्व पायाभूत सोयी सुविधा व निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर योजना सक्षमपणे चालावी याकरीता शासनाने कोणता आराखडा तयार केला आहे काय, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२८-०६-२०२१) :** (१), (२), (३) व (४) सन २००७ पासून "महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम" गृह विभाग, शासन निर्णय, क्रमांक तंमुगां:१००८/सीआर-४३/२००८/पोल-१५, दिनांक १४ ऑगस्ट, २००८ रोजी राज्यात सुरु केली आहे. प्रत्यक्ष योजनेची सुरुवात ही १५ ऑगस्ट, २००७ रोजी झाली आहे. योजनेंतर्गत निकष पूर्ण करणाऱ्या गावांना पुरस्कार दिले जातात.

सदरहू योजना काही सुधारणा करुन पुन्हा सुरु करावयाचे विचाराधीन असून त्यानुषंगाने याबाबतच्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत विचार विनियम होऊन निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रोत्साहन भत्त्यात सुधारणा करण्याबाबत

**(३२) ६८३९ (१७-०३-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ६ ऑगस्ट, २००२ च्या शासन निर्णयानुसार एकस्तर वेतनवाढ व मूळ वेतनाच्या १५ टक्के एवढा किमान रुपये २०० व कमाल रुपये १५०० प्रोत्साहन भत्ता दिला जातो परंतु पाचव्या वेतन आयोगापासून त्यात सुधारणा झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन वाढूनही या योजनेचा विशेष लाभ संबंधीतांना मिळत नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेने या सुधारणेबाबत दिनांक ८ जानेवारी, २०२१ रोजी पत्र देऊन शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त मागणीनुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१२-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) असे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. मात्र, आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध सवलतींचा/ सुविधांचा अभ्यास करुन, त्यामध्ये कालानुरुप बदल करुन, बदललेल्या परिस्थितीत अनुज्ञेय करावयाच्या अर्थिक व बिगर आर्थिक सवलतींचा अभ्यास करुन शासनास शिफारस करण्याकरीता विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.

या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालाव्दारे केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील आदिवासी/ नक्षलग्रस्त भागात सेवारत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना कोणत्या आर्थिक व बिगर आर्थिक सवलती अनुज्ञेय कराव्यात, याबाबतचा अभ्यास करण्यासाठी अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर नगरपंचायत (जि.ठाणे) आस्थापना कर्मचाऱ्यांचे नवनिर्मित नगरपरिषदेमध्ये समावेश करण्याबाबत

**(३३) ६८८१ (१७-०३-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर नगरपंचायत (जि.ठाणे) आस्थापने मधील सफाई व पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे नवनिर्मित नगरपरिषदेमध्ये अद्याप समावेशन झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचे नगरपरिषदेत समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नगरपरिषदेत समावेशन करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) अशा प्रकारचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायती यांमधील आकृतिबंधातील मंजूर व रिक्त उपलब्ध गट “क” व गट “ड” या पदांवर अर्हता प्राप्त सफाई कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
शहापूर नगरपंचायतींतर्गत पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यास्तरावर सुरु असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हयात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नियोजित थांब्यावर गाडी थांबविण्याबाबत

**(३४) ७१५३ (१५-०३-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयात महाराष्ट्र राज्य परिवहनाच्या नियोजित थांब्यावर गाडी थांबत नसल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियोजित थांब्यावर गाडी न थांबविणारा चालक व वाहक यांच्यावर काय कारवाई केली,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परभणी जिल्ह्यातील प्रवाशांची गैरसोय टाळण्याकरीता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या नियोजित थांब्यावर गाडी थांबण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (११-०८-२०२१) :** (१), (२) व (३) परभणी जिल्ह्यात राज्य परिवहन महामंडळाच्या नियोजित थांब्यावर बसेस थांबविण्यात येतात. परंतु काही बसेस नियोजित थांब्यावर थांबविण्यात न आल्याच्या एकूण १० तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित १० कर्मचाऱ्यांना शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार आरोपपत्र दिलेले असून, त्यामधील ३ चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्यातील प्रवाश्यांची गैरसोय टाळण्याकरीता राज्य परिवहन महामंडळाच्या नियोजित थांब्यावर प्रवासी मित्र/वाहतूक नियंत्रक यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

**(३५) ७२१९ (१७-०३-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राचीन मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचा शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला असून या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अप्पर सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यावर किती खर्च अपेक्षित आहे तसेच योजनेच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात

करण्यात येईल व ही कामे केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येतील याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील एकूण ८ मंदिरांचे जतन, संवर्धन व परिसर विकास तसेच भाविकांसाठी सोय सुविधा करण्याचे प्रस्तावित आहे.

पहिल्या टप्प्यातील मंदिरांचे जतन व संवर्धन या कामांकरीता अंदाजपत्रक, सविस्तर प्रकल्प अहवाल इ. कामे करण्यासाठी वास्तुविशारदांची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

ह्या योजनेतील कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा व देवळी (जि.वर्धा) तालुक्यातील जमीन व्यवहाराबाबतचे निर्बंध हटविण्याबाबत

**(३६) ७३०४ (१६-०३-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय प्रकल्पासाठी आवश्यक नसलेली जमीन शेतकऱ्यांना परत करण्याचे आदेश असतानाही वर्धा तालुक्यातील अठरा आणि देवळी (जि.वर्धा) तालुक्यातील बारा गावातील शेतीवरील जमिनीचे व्यवहार करण्याकरीता निर्बंध मागील ४० वर्षांपासून हटविण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वर्धा व देवळी तालुक्यातील तीस गावांवरील जमीन व्यवहाराबाबतचे निर्बंध हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२१-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) वर्धा व देवळी तालुक्यातील ३० गावातील जमिनीचे विक्री /विभाजन/पोटविभागणी इ.बाबत शासन पत्र दिनांक २८/०४/१९९२ अन्वये दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करुन संपादन पात्र क्षेत्र व निर्वाह क्षेत्र राखीव ठेवून खातेदारांना जमिनीचे विक्री/विभाजन/पोटविभागणी इ.परवानगी देण्यात येत आहे. तसेच संपादन पात्र म्हणून राखीव ठेवलेल्या जमिनीचे विक्रीची परवानगी मागितल्यास सदर जमीन लाभक्षेत्रातील राखीव असल्यामुळे सदर जमिनीचे भविष्यात शासनातर्फे भूसंपादन करण्यात आल्यास खरेदी करणाऱ्या व्यक्तीने अशा भूसंपादनास कोणताही अडथळा आणणार नाही, असा करारनामा स्टॅप पेपरवर लेखी सादर केल्यास संपादन पात्र म्हणून राखीव ठेवण्यात आलेल्या जमिनीचे विक्रीची सुध्दा परवानगी देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेतीसाठी लागणाऱ्या खते निर्मितीकरीता कंट्रोल कमिटी नेमण्याबाबत

**(३७) ७८६१ (१६-०३-२०२१) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीसाठी लागणारी किटकनाशके, फंगीसाईड, सेंद्रीय खते व जीवाणू खते निर्मितीवर नियंत्रणाकरीता कंट्रोल कमिटी नेमण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(२) असल्यास, खाजगी कंपन्या खतांची निर्मिती करुन शेतकऱ्यांना जादा किंमतीने खत विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतीसाठी लागणाऱ्या खते निर्मितीकरीता कंट्रोल कमिटी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-०७-२०२१) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) खत (नियंत्रण) आदेश १९८५ मध्ये तरतूद नसल्यामुळे कंट्रोल कमिटी नेमण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सौर कृषीपंप योजनेतून तालुक्याऐवजी गाव हा निकष धरुन सौर कृषीपंप योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(३८) ८००३ (१५-०३-२०२१) श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सौर कृषीपंप योजनेतून तालुक्याऐवजी गाव हा निकष धरुन वगळलेल्या गावांचा सर्व्हे व गावनिहाय तपासणी करुन अहवाल सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या टप्प्यात किती शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला व दुसऱ्या टप्प्यातील किती सौर कृषी पंपांना मंजुरी देण्यात आली तसेच पाणलोट क्षेत्रातील पाणी उपसाची टक्केवारी ६०% पेक्षा कमी असेल तरच त्या तालुक्याला या योजनेचा लाभ घेता येणार होता. त्यामुळे औरंगाबाद मध्ये एकही तालुका पात्र ठरत नव्हता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाअभियान (कुसूम) या योजनेंतर्गत कृषी पंपाना सौर ऊर्जेसाठी किती निधी प्राप्त झाला असून उर्वरीत गांवाचा सर्व्हे करुन या योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२२-०७-२०२१)** : (१) शेतकऱ्याला दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व पारंपारिक पध्दतीने कृषीपंप जोडणीसाठी होणाऱ्या खर्चात व अनुदानात बचत व्हावी यासाठी पारेषण विरहित सौर कृषीपंप उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना दोन टप्प्यात महावितरणव्दारा विविध यंत्रणांच्या समन्वयाने लाभार्थी निवडीच्या अनुज्ञेय निकषानुसार राज्यात राबविण्यात येत आहे.

(२) “मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना” अंतर्गत राज्यात पहिल्या टप्प्यात ३ व ५ अश्वशक्तीचे एकूण २५००० सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत. सदर योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत योजनेच्या निकषानुसार लाभार्थी हिस्सा भरणा केलेल्या ६२७१४ शेतकऱ्यांना लाभ देण्याचे नियोजित आहे व सद्य:स्थितीत ५३४९३ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले. उर्वरीत पंप आस्थापित करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

७.५ अश्वशक्तीचे पंप आस्थापित करण्यासाठी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा जिल्हा औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या सुरक्षित वर्गवारीतील पाणलोट क्षेत्रातील उपशाची स्थिती ६०% पेक्षा कमी असलेल्या यादीनुसार औरंगाबाद जिल्ह्यात ५ तालुक्यामधील १२६ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाअभियान (कुसुम) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार दिनांक १२ मे, २०२१ च्या शासन निर्णयानुसार महाऊर्जामार्फत राबविण्याचे नियोजित असून अद्याप केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूचा विस्तार विरारपर्यंत करण्याबाबत

**(३९) ८१७८ (१७-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याकरीता परिणामकारक ठरणाऱ्या वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूचा विस्तार विरारपर्यंत करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरारदरम्यानच्या ४३ किलोमीटर लांबीच्या या सागरी सेतूच्या पूर्व सुसाध्यता अहवालास शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यासाठी किती रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे आणि उक्त सागरी सेतू किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक १४/०१/२०२१ रोजी पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली असून सदर बैठकीचे इतिवृत्त अपेक्षित आहे.
(३) वर्सोवा-विरार सागरी सेतू ढोबळमानाने अंदाजित खर्च रुपये ३२,८६५.४६ कोटी (सन २०१९) आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खाजगी ट्रॅव्हल्स चालक शासनाच्या नियमाचे उल्लंघन करीत असल्याबाबत

**(४०) ८४०६ (१५-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या पार्श्वभुमीवर काही ठिकाणी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस बंद ठेवण्यात आल्याने लांबपल्ल्याच्या खाजगी ट्रॅव्हल्सना नियम पाळण्याच्या अटीखाली प्रवासाला मुभा देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी ट्रॅव्हल्स चालक कोरोना नियमांचे उल्लंघन करुन राज्यांतर्गत प्रवासी भाड्यात ऑनलाईन बुकिंगच्या माध्यमातून तिकिटाहून अधिक दर आकारुन खाजगी ट्रॅव्हल्सनी प्रवाश्यांची फसवणूक सुरु केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन बुकिंग ॲपमध्ये मुंबई ते चिपळूणचे तिकिट दर १५०० ते २००० रुपयांपर्यंत वाढ झाली असून मुंबई-नाशिक, मुंबई-औरंगाबाद, मुंबई-सातारा यामार्गावरील तिकिट दरात देखील दुप्पट वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू खाजगी ट्रॅव्हल्स राज्य शासनाच्या नियमाचे उल्लघंन करीत असून उक्त खाजगी ट्रॅव्हल्समधून अनेक प्रवासी तोंडाला मास्क लावण्यासह सॅनिटायझरचा वापर करीत नसल्याचे तसेच कोरोना चाचणी अहवालाशिवाय वाहतूक करित असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित खाजगी ट्रॅव्हल्र्स चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०९-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, राज्य शासनाने Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown (MISSION BEGIN AGAIN) अंतर्गत शासन आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक ०४/०४/२०२१ च्या आदेशातील परिच्छेद ४ व ६ येथे नमूद केलेल्या आदेशान्वये सार्वजनिक/पर्यटक/प्रवासी वाहतूक करताना आसन क्षमते इतक्या क्षमतेने वाहतूक करण्यास परवानगी दिली.

(२) अशा आशयाची बातमी दिनांक ३०/०४/२०२१ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे. तथापि, परिवहन आयुक्त कार्यालयाने दिनांक ०३/०९/२०२० व दिनांक ०४/११/२०२० रोजीच्या पत्रान्वये खाजगी ट्रॅव्हल्स बसेसने भाडे आकारणीबाबत सूचना निर्गमित केल्या असून उल्लंघन करणाऱ्या वाहनाविरुध्द कारवाई करण्यात येते.

(३) अशा स्वरूपाची कोणतीही लेखी तक्रार परिवहन आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या असून, प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच पोलीस यंत्रणेमार्फत वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते. त्यानुषंगाने राज्यात वायुवेग पथकांमार्फत कारवाई करण्यात

आली असून जादा भाडे घेणाऱ्या ११८ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच सदर कारवाईतून रुपये १५,००,४९०/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सफाई विभागातील कचरा उचलणाऱ्या वाहनांच्या कंत्राटात गैरव्यवहार केल्याबाबत

**(४१) ८४१६ (१८-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर शहरातील कचरा गोळा करून उत्तन येथील घनकचरा प्रकल्पावर घेवून जाण्यासाठी कंत्राटदार (श्री.मयेकर व श्री.डुबोले) यांचेमार्फत वापरण्यात येत असलेल्या ८० वाहनांपैकी अनेक वाहने नादुरुस्त झाली असून यापैकी कित्येक वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र देखील संपुष्टात आले असल्याची गंभीर बाब दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदार हे उक्त ठिकाणी कमी प्रमाणात कचरा संकलित करीत असूनही जास्त प्रमाणात कचरा संकलित करीत असल्याचे कागदोपत्री दाखवित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त कंत्राटदारामार्फत कचरा उचलण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांचे कंत्राट सन २०१७ मध्ये संपुष्टात आले असतानाही गत ४ वर्षापासून केवळ मुदतवाढीच्या नावावर मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी कंत्राटदारास मोठी रक्कम देवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कंत्राटदार यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०७-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

कंत्राटदार यांच्याकडून घनकचरा वाहतूक करणेकामी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची योग्यता प्रमाणपत्रे घेण्यात आलेली आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्याचे स्त्रोताच्या ठिकाणी सरासरी ७५% ते ८०% विलगीकरण करण्यात येत असून घनकचरा प्रक्रिया करणेकामी मे.सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांना कंत्राट देण्यात आलेले आहे.

मे.सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा.लि. यांच्यामार्फत ओला व सुका कचऱ्यावर स्वतंत्ररीत्या प्रक्रिया करण्यात येते.

घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत कचऱ्याचे वजन केले जाते, ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन रस्ते सफाई व गटार सफाई करणेकामी मे.ग्लोबल मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना दिनांक २६/०४/२०१२ रोजी कंत्राटी सफाई कामगार व वाहन पुरवठा कामाचा ०५ वर्षाकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

महासभा ठराव क्र.१२, दिनांक १९/०५/२०१७ अन्वये पुढील निविदा अंतिम होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन रस्ते, गटार साफसफाई करण्यास आवश्यक मजुर व घनकचरा वाहतूक करणेकामी वाहनांचे ऑपरेशन/मेंटेनन्सकरीता निविदा मागविण्यासाठी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी व गटनेत्यांची बैठक घेऊन निविदा मागविण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) येथील बस स्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामाबाबत

**(४२) ८४३४ (१५-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील बसस्थानकाचे नुतनीकरण करण्याचा निर्णय प्रादेशिक परिवहन विभागाने घेतला असून सदर बसस्थानकाचे नुतनीकरण करण्याकरीता सुमारे रुपये ६ कोटी ५० लाख खर्च करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसस्थानकाच्या कामाच्या निविदा शासनाकडून माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये मागविण्यात आल्यानंतर सदरहू निविदा मंजूरीसाठी मंत्रालयात पाठविण्यात आल्या तेव्हापासून आजतागायत निविदा मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम माहे फेब्रुवारी, २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र मुदत संपून अद्यापपर्यंत अलिबाग बस स्थानकाच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अलिबाग बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१०-०८-२०२१) :** (१), (२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाने अलिबाग (जि.रायगड) येथील बसस्थानकाची पुनर्बांधणी करण्याच्या रुपये ८.१४ कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रकास जून, २०१९ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

बसस्थानक बांधकामाच्या निविदा राज्य परिवहन महामंडळाच्या खातेनिहाय निविदा समितीकडे नोव्हेंबर, २०१९ मध्ये सादर करण्यात आल्या होत्या. तथापि, सदर समितीने निधीची कमतरता असल्यामुळे तुर्तास निविदा परत पाठविल्या आहेत. कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्य परिवहन महसूलात मोठ्या प्रमाणात घट झाली असल्याने, निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नरवडे (जि.रत्नागिरी) येथील खार लँड बंधाऱ्याची दुरुस्ती व बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(४३) ८४३७ (१६-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरवडे (जि.रत्नागिरी) येथील खार जमिनी बंधाऱ्याचे काम अपूर्ण अवस्थेत असून भरतीचे पाणी थेट रहिवासी भागात शिरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडीच्या भरतीचे पाणी गावात शिरू नये यासाठी खार जमिनी विभागाने मुख्य रस्त्यानजीकच्या बंधाऱ्याचे काम काही दिवसापूर्वी हाती घेण्यात आले असून, संबंधित ठेकेदार आणि खार जमिनी विभागाचे दुर्लक्ष यामुळे सदर बंधाऱ्याचे काम बंद असून याचा त्रास येथील ग्रामस्थांना सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्याास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बंधाऱ्याची दुरुस्ती व बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२०-०७-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

सदर योजनेचे नाव वरवडे खारभूमी योजना, ता.जि.रत्नागिरी असे आहे. या योजनेचे नुतनीकरणाचे काम सन २०१९ मध्ये पूर्ण झाले आहे. परंतु सदर कामात सा.क्र. ३८५ चे उघाडीचे काम अंतर्भूत नसल्याने उघाडीच्या दुरुस्तीचे काम इतर निविदेव्दारे चालू आहे. सदर काम पावसाळ्यानंतर माहे नोव्हेंबर, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) नाही.

वरवडे खारभूमी योजनेचे सा.क्र. ३८५ मी. वरील उघाडीच्या दुरुस्तीचे काम माहे मार्च, २०२१ मध्ये हाती घेण्यात आले. तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्याने कामाची अपेक्षित गती राखता आली नाही. तसेच दिनांक २९/०४/२०२१ रोजी समुद्राच्या उधाणामुळे खाडीचे पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने रिंगबंडचे केलेले काम क्षतीग्रस्त होवून भरतीचे पाणी प्रापणक्षेत्रात शिरले.

(३) ठेकेदाराकडून दिनांक ०३/०६/२०२१ रोजी मातीच्या बांधाची पुनर्बांधणी करुन घेतली असून प्रापणक्षेत्रात भरतीचे पाणी जाणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. पावसाळयानंतर निविदेतील तरतूदीनुसार सदर कामे माहे नोव्हेंबर, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उच्चदाब वीज वाहिन्याना गळती लागल्याबाबत

**(४४) ८४८० (०९-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्चदाब वीज वाहिन्यांना लागलेल्या वीज गळतीमुळे माहे मार्च, २०२१ मध्ये १५४ कोटी ८० लाख रुपयांची वीज वाया गेली असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने वीज गळतीमुळे होत असलेले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१६-०७-२०२१) :** (१), (२) व (३) राज्य पारेषण प्रणालीनुसार मार्च, २०२१ मध्ये १५८४६.६६ दशलक्ष युनिट एवढा विजेचा पुरवठा करण्यात आला होता व १५३३०.४१ दशलक्ष युनिट ऊर्जा वापर करण्यात आला. त्यामुळे ३.२६ टक्के इतकी पारेषण हानी झाली आहे. पारेषण हानी ही तांत्रिक बाब असून सनियंत्रित करता येत नाही. ट्रान्समिशन ओपन ॲक्सेस रेगुलेशन २०१९, दिनांक ०८/०५/२०१९ च्या कलम १३ व महाराष्ट्र वीज नियम आयोग यांच्या दिनांक ३०/०३/२०२० च्या आदेशान्वये सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या नियंत्रित कालावधीसाठी राज्य पारेषण हानी

३.१८ टक्के इतकी मंजूर केली आहे. मात्र सन २०२०-२१ ची राज्य पारेषण प्रणाली हानी (२.९३%) ही २०१९-२० च्या राज्य पारेषण प्रणाली हानी (३.१७%) च्या तुलनेत तसेच महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सन २०२०-२१ ते २०२४-२५ च्या नियंत्रित कालावधीसाठी मंजूर केलेल्या ३.१८% ह्या हानीच्या तुलनेत कमी आहे.

सन २०२०-२०२१ मध्ये पारेषण हानी कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना/कामे करण्यात आली आहेत.

अ) अतिभार असणारे रोहित्र/आय.सी.टी. यांना क्षमतावाढ योजनेंतर्गत बदलण्यात आलेले आहे.

ब) समांतर परिपथ/अतिरिक्त परिपथ स्थापित करुन वाहिनीचा भार कमी करण्यात आलेला आहे. पारेषण वाहिन्यांमध्ये उच्च क्षमतेच्या तारा (High Ampacity Conductor) वापरण्यात येत आहे.

क) पॉवर फॅक्टर सुधारण्याकरीता तसेच आवश्यक रिॲटिव्ह पॉवरचे व्यवस्थापन करण्याकरीता कपॅसिटर बँकेचा वापर करण्यात आला आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४५) ८४८१ (१०-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रात कोरोना संसर्ग झपाट्याने वाढत असताना ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवकांची १४४ पदे रिक्त असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आरोग्य सेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०८-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राप्त अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवकांची पदे मंजूर नाहीत. तथापि, आरोग्य सेविका (एएनएम) ची पदे मंजूर आहेत. ठाणे जिल्ह्यात आरोग्य सेविकेच्या (एएनएम) ६४ तर पालघर जिल्ह्यात ३४ पदे रिक्त आहेत.

(२) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १४/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदभरतीला मान्यता मिळाली असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे.

(३) कार्यवाही सुरू आहे.

---

## पुरंदर (जि.पुणे) येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाबाबत

**(४६) ८५६१ (११-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५३८२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ रोजी जागा निश्चित करण्यात आलेली असून या विमानतळासाठी सुमारे २८३२ हे.आर जागा अधिसूचित केलेली आहे व यासाठी माहे मे, २०१८ पर्यंत आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळ विकसित करण्याची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे सोपविण्यात आलेली असून सदर कंपनीच्या संचालक मंडळाच्या दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या ६५ व्या बैठकीतील निर्णयानुसार दिनांक २ सप्टेंबर, २०१९ रोजी Pune (Purandar) International Airport

Ltd. (PIAL) या संयुक्त कंपनीची स्थापना करण्यात आलेली असून उक्त बैठकीत विमानतळाच्या केवळ भूसंपादनासाठी रुपये ४००० कोटी एवढया निधीची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निधी उपलब्ध करुन कामास सुरुवात न केल्यास त्याचा प्रकल्पावर विपरित परिणाम होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विमानतळ भूसंपादनाकरीता लागणाऱ्या निधीसह उक्त विमानतळ उभारण्यासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे, प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे, उर्वरित निधी कशाप्रकारे, केव्हा उपलब्ध करण्यात येणार आहे व त्यातून करावयाच्या कामाचे स्वरुप काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१२-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) शासन निर्णय दिनांक ०९ मे, २०१८ नुसार पुणे (पूरंदर) येथे प्रस्तावित विमानतळासाठी सुमारे २३६७ हे.आर जमीन संपादन करण्याबाबत अंदाजित रुपये ३५१३.०० कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर विमानतळाच्या उभारणीकरीता सुमारे रुपये ४०००.०० कोटी इतका निधी आवश्यक आहे.

आतापर्यंत PIAL मधील Share Capital मधून रुपये ५० कोटी निधी उपलब्ध झाला आहे.

Pune International Airport Limited (PIAL) या संयुक्त कंपनीतील भाग भांडवल रुपये ७६० कोटी निधी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., रुपये २०४० कोटी सिडको व प्रत्येकी रुपये ६०० कोटी इतका निधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी द्यावयाचा आहे.

सदर निधी विमानतळाच्या भूसंपादनासाठी खर्च होणे अपेक्षित आहे. तथापि, स्थानिकांच्या प्रचंड विरोधामुळे विमानतळाचे प्रस्तावित स्थळ रिसे-पिसे-पांडेश्वर या तुलनात्मक कमी लोकसंख्येच्या, कमी कृषीक्षेत्राच्या जागेत हलविण्याबाबत चाचपणी शासनाच्या निर्देशानुसार व स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच महसूल विभागाच्या सल्ल्यानुसार केली जात असून त्याकरीता भारतीय संरक्षण मंत्रालय व नागर विमानन मंत्रालयाकडे अनुक्रमे दिनांक १०/०२/२०२१ व दिनांक २५/०३/२०२१ रोजी प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या.मार्फत सादर करण्यात आले आहेत व त्याचा पाठपुरावा केला जात आहे. याबाबत केंद्र शासनाच्या संबंधित विभागाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(५) निरंक.

---

## नागपूर शहरातील मा.उच्च न्यायालयाची जुनी इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(४७) ८५८१ (१५-०७-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील राष्ट्रीयस्तरावर संरक्षित म्हणून घोषणा झालेली मा.उच्च न्यायालयाची जुनी इमारत वेळू लाकडी खांबाच्या आधारावर उभी असल्याची बाब माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारतीच्या देखरेखीसाठी व डागडुजीसाठी ७८ लाख रूपयांचे टेंडर काढण्यात आले असूनही कोणत्याही कंत्राटदार कंपनीने उक्त कामास संमती दर्शविली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०८-२०२१) :** (१) सदर इमारत केंद्रीय लोक निर्माण विभाग, नागपूर (CPWD) यांच्या अखत्यारित येत असल्यामुळे या विभागाशी संबंधित नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता पद रिक्त असल्याबाबत

**(४८) ८५९८ (१५-०७-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अधिक प्रमाणात काम करण्यात येत असल्यामुळे सदर विभाग खामगांव (घाटा खालील) व बुलढाणा (घाटावरील विभाग) अशा दोन भागात विभागला गेला असून घाटावरील उपविभागात बुलढाणा, मेहकर चिखली व सिंदखेडराजा ह्या तीन विधानसभा क्षेत्राचा समावेश होत असून याठिकाणी पर्यटन क्षेत्र सुध्दा मोडत असल्यामुळे उक्त रस्त्यांची विकास कामे सध्या वेगाने सुरू असून अनेक महामार्गाचे काम सद्या प्रगतीपथावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सर्व क्षेत्रातील कामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यकारी अभियंता हे पद भरणे आवश्यक असताना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गत नऊ महिन्यांपासून सदर पद रिक्त असून सद्य:स्थितीला उक्त पदचा कार्यभार प्रभारी पदावर सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा सार्वजनिक बांधकाम विभागात कामाचा बोजवारा उडाला असून विभागातील अनेक अभियंते बदलीच्या ठिकाणी न जाता आपल्या आवडत्या ठिकाणी काम करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात प्रसार माध्यमांमध्ये छापून आलेल्या बातमीच्या अनुषंगाने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साधारणतः तीन वर्षानंतर अधिकाऱ्यांच्या बदल्या होणे अपेक्षित असताना सलग ५ वर्षे एकच कार्यकारी अभियंत्याकडे बुलढाणा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी पदाचा पदभार असतानाही बदलीनंतर त्याच कार्यकारी अभियंत्याकडे (सहाव्या वर्षी देखील) प्रभारी पदभार देण्याची सर्वसाधारण कारणे काय असून बुलढाणा येथे सध्या कार्यकारी अभियंता (प्रभारी) म्हणून कार्यरत असलेल्या (कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग, खामगांव) यांच्या मनमानी कारभारबाबत तसेच गैरव्यवहाराबाबत शासनाकडे किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने त्यांच्यावर कारवाई करुन बुलढाणा सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२३-०८-२०२१) :** (१) होय.

(२) प्रशासकीय कारणास्तव सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा या कार्यालयातील कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

(३) नाही.

सन २०२० मध्ये सा.बां.विभाग बुलढाणा अंतर्गतचे नियमित बदलीस पात्र ठरलेले ३ कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहायक अभियंता श्रेणी २ हे बदलीनंतर त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाले आहेत.

(४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांची बदली, बदली अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात आलेली आहे. कार्यकारी अभियंता संवर्गातील उपलब्ध मनुष्यबळ विचारात घेता रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सा.बां.विभाग, बुलढाणा या पदाचा अतिरिक्त कार्यभार हा सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५/०९/२०१८ च्या परिपत्रकातील तरतूदीनुसार देण्यात आलेला आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांच्याबाबत ४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याची चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालयांमधील अग्निसुरक्षा यंत्रणेमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्याबाबत

**(४९) ८६१० (११-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली महानगरपालिका क्षेत्रातील २८७ पैकी ४५ रुग्णांलयामधील अग्निसुरक्षा यंत्रणेत अनेक त्रुटी आढळून आल्या असून अग्निशमन नुतनीकरणाचे ९२ रुग्णांलयाचे दाखलेही आरोग्य विभागाकडे अद्याप प्राप्त झाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयांनी नोंदणी व नुतनीकरण तसेच अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला याकरीता नर्सिंग होम कायद्यांतर्गत सुरक्षा यंत्रणा उभारलेली असून मात्र, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांअभावी रुग्णालयांच्या अग्निसुरक्षा यंत्रणेकडे झालेल्या दुर्लक्षामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अग्निशमन सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या रुग्णालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०७-२०२१) :** (१) सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेल्या एकूण २८७ नोंदणीकृत रुग्णालयांपैकी सन २०२०-२१ मध्ये २६७ रुग्णालयांचे अग्निशमन विभागाच्या ना-हरकत दाखल्याचे प्रस्ताव प्राप्त झाले असल्याचे तसेच, उर्वरित २० रुग्णालयांचे प्रस्ताव अप्राप्त असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी ४५ रुग्णालयांमध्ये अग्निशमन उपाययोजना करताना राहिलेल्या त्रुटींबाबत रुग्णालयांना कळविण्यात आले आहे.

नोंदणीकृत २८७ रुग्णालयांपैकी यावर्षी आरोग्य विभागाकडे २१९ रुग्णालयांचे नोंदणी/नुतनीकरण झालेले आहे. तर, उर्वरित ६८ रुग्णालयांचे नोंदणी/नुतनीकरणाचे प्रस्ताव अद्याप आरोग्य विभागाकडे सादर केलेले नसल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) कोविड रुग्णालय आणि इतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना जानेवारी, २०२१ पासून अग्निशमन यंत्रणा हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अग्निशमन उपाययोजना करण्यामध्ये त्रुटी राहिलेल्या रुग्णालयांना नोटीसी बजाविण्यात आल्या असून त्रुटींची पुर्तता करुन घेण्याची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर प्राधान्याने सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी को-२६५ या जातीच्या ऊसाची नोंद घेण्याबाबत

**(५०) ८६१४ (१७-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादक कारखान्यानी को-२६५ या जातीच्या ऊसाची नोंद घेतलीच पाहिजे, तसेच तो ऊस गळीतासाठी नेणे बंधनकारक असल्याचा आदेश साखर आयुक्त कार्यालयाने काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही साखर कारखान्याकडून को-२६५ या जातीच्या ऊसाची नोंद घेण्यास टाळाटाळ होत असून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने को-२६५ या जातीच्या ऊसाची नोंद घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या साखर कारखान्यावर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२०-०७-२०२१) :** (१) साखर आयुक्त कार्यालयाने दिनांक ११/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये को-२६५ या ऊसाच्या जातीची नोंद घेणेबाबत साखर कारखान्यांना सूचना दिलेल्या आहेत.

(२) शेतकरी संघटना, कारेगाव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २३/११/२०२० च्या पत्रान्वये को-२६५ या ऊसाच्या जातीच्या लागवडीच्या नोंदी घेण्याचे साखर कारखाने नाकारत आहेत अशी तक्रार केली आहे व अशा

कारखान्यावर कारवाई करण्याची विनंती केली आहे. परंतु नेमक्या कारखान्याचे नाव किंवा कोणत्या शेतकऱ्याची तक्रार आहे, याबाबत माहिती दिलेली नाही.

(३) व (४) शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या को-२६५ या जातीच्या ऊसाची नोंद साखर कारखाना घेत नसलेबाबत वैयक्तिकपणे कोणत्याही शेतकऱ्याची साखर कारखान्याच्या नावाने तक्रार प्राप्त नसल्यामुळे चौकशी केलेली नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.